देशदूत
www.deshdoot.com
पोस्टाने पाठविण्याचा परवाना क्र. एन.एस.के./ ५५/२०२४–२६ आर.एन.आय. नंबर : १८९१८/१९७०.
/deshdoot /deshdoot /deshdoot Daily Newsgram
रविवार, दि. ११ मे २०२५







भारत आणि पाकिस्तान यांच्यात सुरू असलेल्या संघर्षादरम्यान पाकिस्तानने केलेले ड्रोन हल्ले भारताने हाणून पाडले.त्यानंतर हिमाचल प्रदेशातील कांगडा जिल्ह्यात ड्रोनच्या अवशेषांसारख्या संशयास्पद वस्तू आढळून आल्या.राजस्थानमधील बाडमेर येथेही एका अज्ञात वस्तूचे अवशेष सापडले.हरियाणातील सिरसा येथे एका अज्ञात प्रक्षेपकाच्या अवशेष सापडले.

# पाकचे दावे भारतीय लष्कराने फेटाळले

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने प्रत्युत्तर म्हणून पाकिस्तान आणि पाकव्याप्त जम्मू आणि काश्मीरमधील दहशतवादी तळांवर हल्ले केले होते. ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून केलेल्या या लष्करी कारवाईनंतर पाकिस्तान सातत्याने भारतातील शहरांवर हल्ले करण्याचा प्रयत्न करत आहे. अशात पाकिस्तानने काल भारतातील काही रुग्णालये आणि शाळांवर हल्ले केल्याची माहिती भारतीय लष्कराच्या अधिकारी कर्नल सोफिया कुरेशी यांनी दिली आहे.

शनिवारी सकाळी नवी दिल्लीत परराष्ट्र मंत्रालयाने घेतलेल्या पत्रकार परिषदेत कर्नल सोफिया कुरेशी यांनी सांगितले की, पाकिस्तानने पंजाबमधील हवाई तळावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. पाकिस्तानी सैन्य सीमावर्ती भागात त्यांचे सैन्य हलवत असल्याचे दिसून आले आहे. लष्करी तळांना लक्ष्य करण्याव्यतिरिक्त, पाकिस्तानने श्रीनगर, अवंतीपुरा आणि उधमपूरमधील वैद्यकीय सुविधांनाही लक्ष्य केले.यावेळी परराष्ट्र मंत्रालयाने पाकिस्तान अफवा पसरवत असल्याचे स्पष्ट केले. परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री म्हणाले की, गेल्या काही दिवसांपासून पाकिस्तान प्रक्षोभक आणि उत्तेजक कृती करत आहे. पाकिस्तानचे भारतीय पायाभूत सुविधांचे गंभीर नुकसान झाल्याचे दावे पूर्णपणे खोटे आहेत. यावेळी त्यांनी धार्मिक स्थळावर क्षेपणास्त्र डागल्याच्या पाकिस्तानच्या दाव्याचेही यांनी खंडन केले आणि हे दावे हास्यास्पद असल्याचे म्हटले.

विंग कमांडर व्योमिका सिंग यांनीही म्हटले की, पाकिस्तानने दुर्भावनापूर्ण चुकीच्या माहितीच्या मोहिमेचा प्रयत्न केला आहे. आपली एस-४०० प्रणाली आणि सुरत येथील हवाई तळ नष्ट करण्याचे त्यांचे दावे खोटे आहेत.

## पाकिस्तानच्या चार दाव्यांचा समाचार

**पहिला दावा–** पाकिस्तानने दावा केला होता की त्यांच्या लष्कराने जीएफ १७ या फायटर जेटच्या मदतीने भारताची एस ४०० सुदर्शन ही एअर डिफेन्स सिस्टिम उद्ध्वस्त केली. पण हा दावा पूर्णपणे चुकीचा असल्याचे सोफिया कुरेशी म्हणाल्या तसेच, पाकिस्तानने भारताचे ब्रह्मोस मिसाईल देखील पाडल्याचा दावा पाकिस्तानने केला होता हा दावाही पूर्णपणे खोटा असल्याचे कर्नल कुरेशी यांनी पत्रकार परिषदेत नमूद केले

**दुसरा दावा–** पाकिस्तानने दावा केला होता की त्यांच्या लष्कराने भारताच्या सिरसा, जम्मू, पठाणकोट, भटिंडा, नलिया आणि भुज या ठिकाणच्या हवाई दलाच्या तळांवर हल्ले चढवले आणि या तळांचे नुकसान केले. पण या तळांचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झालेले नसून पाकिस्तानचे हल्ले यशस्वीरीत्या परतवून लावल्याचे कुरेशी म्हणाल्या. तसेच पुराव्यादाखल या तळांवरचे फोटोदेखील सकाळच्या पत्रकार परिषदेत सादर केले.

**तिसरा दावा –** चंदीगड व वियास या ठिकाणी असणाऱ्या भारताच्या शस्त्रसाठ्यावर पाकिस्तानी लष्कराने हल्ला करुन तिथे मोठें नुकसान केल्याचा दावा पाकिस्तानकडून करण्यात आला होता. हा दावादेखील खोटा असल्याचे कर्नल सोफिया कुरेशी म्हणाल्या. या ठिकाणांचेही फोटो पत्रकार परिषदेत सादर केले.

**चौथा दावा :** भारतीय लष्कराने पाकिस्तानमध्ये मशिदींवर हल्ले केल्याचा दावा पाकिस्तानकडून करण्यात आला.पण पाकिस्तानचा हा दावाही पूर्णपणे खोडून काढला.भारत एक धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे,आमचे लष्कर भारताच्या घटनात्मक मूल्यांचे एक फार सुंदर रूप आहे अशी भूमिका कर्नल सोफिया कुरेशी यांनी मांडली.

# पाच कट्टर दहशतवाद्यांचा खात्मा

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

ऑपरेशन सिंदूर अंतर्गत भारताने पाकिस्तानमधील दहशतवादी अड्ड्यांवर केलेल्या हल्ल्यात ठार झालेल्यांमध्ये लष्कर-ए-तैयबा, जैश-ए-मोहम्मद आणि बंदी घातलेल्या दहशतवादी संघटनांशी संबंधित किमान पाच कट्टर दहशतवादी असल्याचे सूत्रांनी सांगितले.

७ मे रोजी भारताने केलेल्या हल्ल्यात मारले गेलेले पाच दहशतवादी येथे आहेत.मुदस्सर खादियान खास उर्फ मुदस्सर उर्फ अबू जुंदाल लष्कर-ए-तोयबाचा मुदस्सर खादियान खान उर्फ मुदस्सर उर्फ अबू जुंदाल हा मुरीदके येथील मरकज तैयबाचा प्रमुख होता.त्यांच्या अंत्यसंस्कारात पाकिस्तानचे लष्करप्रमुख असीम मुनीर आणि पंजाबच्या मुख्यमंत्री मरियम नवाज यांच्या वतीने पुष्पहार अर्पण करण्यात आला.

एका सरकारी शाळेत झालेल्या अंत्यसंस्काराच्या प्रार्थनेचे नेतृत्व हाफिज अब्दुल रौफ यांनी केले,तो जागतिक दहशतवादी संघटना जमात उद दावाचा नेता आहे.हाफिज मुहम्मद जमील हा जैश-ए-मोहम्मदचा संस्थापक मौलाना मसूद अझहर याचा मोठा भाऊ आहे.जमील हा बहावलपूरमधील मरकज सुभान अल्लाहचा प्रभारी होता, जो हल्ल्यात जखमी झाला होता.

जैश ए-मोहंमदचा दहशतवादी मोहंमद हसन खान याचाही हल्ल्यात खात्मा झाला आहे. याचा जम्मूतील कारवायांमध्ये सहभाग होता. मोहंमद युसूफ अझहर हा समूद अझहरचा मेहुणा असून कंदहार विमान अपहरण प्रकरणात वॉण्टेड होता.

# पाकला दणका; अकरा एअरबेस लक्ष्य

पाकिस्तानकडून शुक्रवारी रात्रीही भारतातील विविध शहरांवर हवाई आणि ड्रोन हल्ल्यांचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, भारतीय लष्कर आणि वायूदलाने अत्यंत अचूक आणि निर्णायक प्रत्युत्तर दिले आहे.

भारतीय वायूदलाने दिलेल्या प्रतिहल्ल्यात पाकिस्तानमधील मुरीद, चकवाल, शोरकोट, रहीम यार खान, चुनियां, नूरखान, सुक्कुर, सरगोदा, जकोराबाद, गुलारी, कर्दु एअरबेस यांच्यावर हल्ले करून पाक लष्कराच्या महत्त्वाच्या रणनीतिक संसाधनांना धक्का दिला आहे. पाकिस्तानच्या लष्कर प्रवक्त्यांनी देखील ही माहिती जाहीर करताना मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याचे मान्य केले आहे. भारतीय सैन्याने पाकिस्तानची तांत्रिक यंत्रणा, कमांड अँड कंट्रोल सेंटर्स, रडार यंत्रणा आणि शस्त्र साठवणूक केंद्रांवर थेट प्रहार केला आहे. यामुळे पाकिस्तानच्या लष्करी धोरणाच्या मुळावर घाव घातल्याचे दिसून येत आहे.

## भारताने काल लक्ष्य केलेले लष्करी तळ

* मुरीद चकवाल एअरबेस (पंजाब): पाकिस्तानच्या आधुनिक ड्रोन यंत्रणेचे मुख्य केंद्र, जिथून भारतावरील ड्रोन हल्लूयांचे नियोजन होत होते.
* सुक्कुर / पीएएफ भोलारी एअरबेस (सिंध): एफ१६ फायटर जेट्सचे कार्यक्षेत्र असलेला पाकिस्तानचा दक्षिण कमांडचा मुख्य तळ.
* चुनियां एअरबेस: लाहोरजवळील संवेदनशील तळ, पाकिस्तानच्या हवाई संरक्षणासाठी अत्यंत महत्त्वाचा.
* नूरखान एअरबेस (रावळपिंडी) पाकिस्तान वायूदलाचा 'लाइफ लाइन'महत्त्वाच्या हालचाली आणि लॉजिस्टिकसाठी महत्त्वाचे केंद्र.
* रफीकी एअरबेस (शोरकोट): जेएफ१७ आणि मिराज फायटर जेट्सचा तळ, दीर्घ रनवे आणि अत्याधुनिक सुविधा असलेला तळ.
* रहीम यार खान एअरबेस: भारताच्या सीमेपासून जवळ, पूर्व सीमेवर जलद कारवाईसाठी वापरला जाणारा तळ. येथे हल्लूयानंतर मोठा स्फोट होऊन खड्डा तयार झाल्याचे निदर्शनास आले आहे.




देशदूत
हे दैनिक मुद्रक व प्रकाशक **राजेंद्र कृष्णराव सोनवणे** यांनी श्रीरंग प्रकाशन प्रा.लि. यांच्याकरिता प्लॉट क्र. बी ६४, नाईस, सातपूर, नाशिक – ४२२००७ येथे मुद्रित करून देशदूत कार्यालय, कॉंग्रेस हाऊस, म.गांधी रोड, नाशिक येथे प्रसिद्ध केले. ● संपादक – * **डॉ. वैशाली बालाजीवाले** : शहर– २५७५७१६, २५७२४००, फॅक्स – २५७०९३८. ● नाशिकरोड कार्यालय – २९४२२०३, ● मालेगाव कार्यालय फोन व फॅक्स – ०२५५४–२९९२०३, ● सिन्नर फोन व फॅक्स –०२५५१ – २९९२०३, ● दिंडोरी फोन व फॅक्स – ०२५५७–२२२८८८, ● निफाड फोन व फॅक्स – ०२५५७–२९९६९६. (* पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) ● Mail id : newseditnsk@deshdoot.com

cmyk